# "सुवर्ण महोत्सव उद्घाटन समारोह"

दि. २९/०१/२०१९

डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला व वाणिज्य महाविद्यालयाने आपला ५० वर्षाचा शैक्षणिक व सांस्कृतिक प्रवास पूर्ण केलेला आहे. या सोनेरी प्रसंगाच्या औचित्याने सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दि. २९/०१/२०१९ रोजी सकाळी ११:०० वाजता उद्घाटन समारोह या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ. श्री. मधुकरराव वासनिक, माजी आमदार, संस्थापक अध्यक्ष, पिपल्स् वेलफेअर सोसायटी, नागपूर हे होते व उद्घाटक म्हणून मा. ना. श्री. नितिन गडकरी, केंद्रिय मंत्री रेल्वे वाहतूक, महामार्ग, जलसंपदा, नौकानयन, नदि विकास, गंगा पुनरुत्थान भारत सरकार हे होते. विशेष अतिथी म्हणून मा. ना. श्री. चंद्रशेखर बावणकुळे मंत्री, उर्जा, राज्य उत्पादन शुल्क व पालकमंत्री नागपूर, महाराष्ट्र राज्य हे होते. तसेच भंते आर्य नागार्जून सुरई ससाई, बौद्ध धर्मगुरु हे लाभले होते. प्रमुख पाहुणे म्हणून मा. दत्ताजी मेघे माजी खासदार, मा. श्री. मिलींद माने आमदार, उत्तर नागपूर तसेच मा. श्री. नागो गाणार, विधान परिषद सदस्य शिक्षक मतदार संघ नागपूर विभाग हे होते. तसेच मा. श्री. उपेन्द्र शेंडे, माजी आमदार व मा. डॉ. श्री. भाऊ लोखंडे सुप्रसिद्ध, आंबेडकरी विचारवंत मंचावर उपस्थित होते.

सुवर्ण जयंतीच्या उद्घाटन प्रसंगी मा. ना. श्री. नितिन गडकरी, केंद्रिय मंत्री रेल्वे वाहतूक, महामार्ग, जलसंपदा, नौकानयन, नदि विकास, गंगा पुनरुत्थान भारत सरकार यांनी आपल्या उद्घाटनीय भाषणातून विदर्भात येणाऱ्या उद्योगांना अनुरुप ठरतील असे

व्यवसायाभिमुख व तांत्रिक अभ्यासक्रम विद्यापीठांनी तयार करणे व महाविद्यालयातून अभ्यासक्रमाद्वारे प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण होणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केंद्रिय रस्ते वाहतूक मंत्री नितिन गडकरी यांनी केले. तसेच एच. सी. एल. सारख्या नामांकित आय. टी. कंपन्यांनी मिहानमध्ये आतापर्यंत दोन हजार युवकांना रोजगार दिला. पुढील दोन वर्षात एच. सी. एल. द्वारे १२ हजार रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. मिहान व बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रात येणाऱ्या उद्योगांना पुरक ठरतील अशा अभ्यासक्रमाची आखणी करण्यासाठी विद्यापीठ अभ्यास मंडळाच्या सदस्यांनी संबंधित उद्योजकांशी चर्चा करावी असे मा. गडकरी यांनी सुचविले. नागपूरच्या सिम्बॉयसिस विद्यापीठाद्वारे विदर्भातील मुलांना जागतिक स्तरावरचे शिक्षण मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. केंद्रिय रस्ते वाहतूक मंत्रालयाच्या सी. एल. आर. निधितून पी. डब्ल्यू. एस. महाविद्यालयाच्या विद्युतीकरणासाठी सोलर पॅनेल्स उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन गडकरींनी याप्रसंगी दिले.

स्वागताध्यक्ष मा. श्री. अटलबहादुर सिंग यांनी आपल्या भाषणातून पश्चिम नागपूरातील प्रसिद्ध महाविद्यालयासारखेच पी. डब्ल्यू. एस. महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या पसंतीचे महाविद्यालय आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. यशवंत पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकातून सांगितले की, गेल्या ५० वर्षात महाविद्यालयातून शिक्षण घेवून बाहेर पडलेले एक लाख विद्यार्थी विविध क्षेत्रात सेवा प्रदान करीत आहेत. या प्रसंगी स्मरणिका 'प्रज्ञापथ' याचे विमोचन अतिथींच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार महाविद्यालयाचे उपप्राचार्य मा. डॉ. नरेंद्र बागडे यानी मानले. कार्यक्रमाला संस्थेचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमात एकूण ..५००....... विद्यार्थी उपस्थित होते.

1) "बाबा का जागले? का रडले?"

दि. १७/०१/२०१९

डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या अंतर्गत सुवर्ण महोत्सव सांस्कृतिक समितीच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दि. १७/०१/२०१९ रोजी "बाबा का जागले? का रडले?" या नाटकाचे आयोजन करण्यात आले. डॉ. बाबासाहेबांचे विचार आमच्या विद्यार्थ्यांना समजावे त्यांच्या विचारांपासून आमचा विद्यार्थी प्रेरीत व्हावा आणि दिवसेंदिवस प्रगतीच्या दिशेने वाटचाल करावा हा आमचा त्यामागचा उद्देश होता.

ही नाटीका डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन व कार्यावर आधारित असून त्यामध्ये मुख्य भूमिका डॉ. राजेंद्र गायकवाड, आणि संच यांनी पार पाडली. कार्यक्रमात एकूण 100 विद्यार्थी उपस्थित राहिलेत. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. कमलाकर तागडे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. नागपूरे यांनी मांडले

## २) “यशोगाथा”

**दि. १८/०१/२०१९**

डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या अंतर्गत सुवर्ण महोत्सव सांस्कृतिक समितीच्या वतीने दि. १८/०१/२०१९ रोजी “यशोगाथा” या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांत अभ्यासू वृत्ती वाढावी, तसेच त्यांना स्पर्धात्मक परिक्षेचे ज्ञान प्राप्त व्हावे एवढेच नव्हे तर त्यांच्या मार्गदर्शनाने आमचा विद्यार्थी प्रेरित व्हावा या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

‘यशोगाथा’ या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते आय. पी. एस. सनदी अधिकारी मा. दिक्षितकुमार गेडाम पोलीस अधिकक्षक, सिंधुदुर्ग, जिल्हा सिंधुदुर्ग (कोकण) हे होते. त्यांनी आपल्या भाषणातून स्पर्धात्मक परिक्षेची तयारी कशी करायला पाहिजे. त्याकरिता कोणत्या पुस्तकाचे वाचन केले पाहिजे एवढेच नव्हे तर आपण एक आदर्श नागरिक म्हणून देशाला काही देणे लागते त्या माध्यमातून आपण देश सेवा करु शकतो असे आव्हाण त्यांनी आपल्या भाषणातून केले. आपल्यात इच्छा आणि जिद्द असेल तर आपण काहीही करु शकतो असे प्रेरणादायी भाषण त्यांनी विद्यार्थ्यांकरिता दिले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे माजी प्राचार्य मा. जानरावजी गजभिये हे होते. त्यांनी आपल्या भाषणातून शिक्षणाचे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले. शिक्षणाने माणूस फार मोठा बनू शकतो. आपल्या आई वडीलांप्रती आणि देशाप्रती काही कर्तव्ये असून शिक्षणाद्वारे आपण आपल्या कर्तव्याचे पालन करु शकतो. या कार्यक्रमाला एकूण.....४००........ विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. सी. एस. पाटील यांनी केले व आभार डॉ. मेघा रामटेके यांनी मानले. शिस्त समितीत आकाश राव, पियू राजमलानी यांनी महत्वाची भूमिका पार पाडली.

## ४) “प्रबोधनाकडून परिवर्तनाकडे”

दि. २१/०१/२०१९

डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या अंतर्गत सुवर्ण महोत्सव सांस्कृतिक समितीच्या वतीने दि. २१/०१/२०१९ रोजी “प्रबोधनाकडून परिवर्तनाकडे” या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रबोधनकार तुषार सुर्यवंशी, महाराष्ट्र भूषण पुरस्कार पुरस्कृत हे होते. त्यांनी आपल्या खंजेरीच्या माध्यमातून तरुण वर्गाला शिक्षणाचे महत्व समजावून सांगितले. तरुण वर्गाला समाज सेवा करावी असे आव्हाण केले. त्यांनी वेगवेगळ्या संताचे उदाहरण देवून मनोरंजनातून प्रबोधन करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. शारिरिक व्यायमाचे महत्व त्यांनी सांगितले. त्याकरिता श्रम केले पाहिजे. श्रम केल्याने शरीर सुधृड व स्वस्थ राहते. देशाच्या प्रगतीत आपला हातभार लागला पाहिजे, आपले जीवन देशसेवेसाठी कामी आले पाहिजे असा संदेश त्यांनी आपल्या भाषणातून सांगितला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे माजी प्राचार्य प्रा. डी. एम. राऊत हे होते. त्यांनी आपल्या भाषणातून पी. डब्ल्यू. एस. महाविद्यालयाचे महत्व समजावून सांगितले. त्यांनी महाविद्यालयातील जुन्या आठवणी सांगितल्या. कार्यक्रमाचे संचालन डॉ. सुशांत चिमनकर यांनी केले व आभार प्रा. रश्मी मुळे यांनी मानले.

## ५) "व्यवसायिक शिक्षण काळाची गरज"

दि. २२/०१/२०१९

डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या अंतर्गत सुवर्ण महोत्सव सांस्कृतिक समितीच्या वतीने विद्यार्थ्यांना विविध उद्योगाविषयीचे ज्ञान प्राप्त व्हावे, त्यांना रोजगारांच्या संधी प्राप्त व्हाव्या आणि विद्यार्थ्यांना अद्यावत ज्ञान प्राप्त व्हावे या उद्देशाने 'व्यावसायिक शिक्षण एक काळाची गरज' या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २१ जानेवारी २०१९ रोजी करण्यात आले. प्रमुख वक्ते मा. गोपाळ वासनिक विदर्भ प्रदेश : दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रिज (डिक्की) हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. अंबादास वानखेडे (माजी प्राचार्य) हे होते. प्रमुख वक्ते मा. गोपाळ वासनिक यांनी आपल्या भाषणातून दलित, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शासनाकडून उद्योग करण्याकरिता कशा प्रकारची आर्थिक मदत मिळते हे सांगितले. उद्योगामध्ये यश मिळविण्याकरिता काय करायला पाहिजे? एवढेच नव्हे तर विविध उद्योगाविषयी ज्ञान देवून विर्द्यार्थ्यांना प्रोत्साहीत केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे माजी प्राचार्य मा. अंबादास वानखेडे यांनी आपल्या भाषणातून शिक्षणाचे आणि नैतिक मुल्यांचे महत्व सांगितले. शिक्षणाने माणूस मोठा होतो. त्यांनी स्पर्धात्मक परिक्षेचे महत्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. इंग्रजी माध्यमाचे महत्व समजावून सांगितले. तरुणाला आपल्या देशाप्रती काही कर्तवयाचे पालन करायचे असते ते आपण आदर्श नागरिक होवून पार पाडायला पाहिजे. या कार्यक्रमाला एकूण ५00 विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. डॉ. विवेक चव्हाण यांनी केले व आभार मोहिन शिद्दिकी यांनी मानले.

## ६) "मी रमाई बोलते"

दि. २४/०१/२०१९

डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या अंतर्गत सुवर्ण महोत्सव सांस्कृतिक समितीच्या वतीने विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य समजावे. आमचा विद्यार्थी आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित व्हावा तसेच विद्यार्थ्यांतील सुप्त गुणांचा विकास व्हावा म्हणून 'मी रमाई बोलते' या एकपात्री नाटकाच्या प्रयोगाचे आयोजन दि. २४/०१/२०१९ रोजी करण्यात आले. एकपात्री नाटकाचे सादरीकरण सांची जीवने (नाट्य अभिनेत्री) हिने केले. तिने आपल्या नाटकातून रमाबाईचे जीवन कार्य आणि तिचे आंबेडकरांच्या जीवनात काय स्थान होते, तिने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या खांद्याला खांदा लावून माताश्री रमाई कशा वाढल्या, त्यांना कोणकोणत्या अडचणी गेल्या, त्यांना कशा प्रकारच्या यातना सोसाव्या लागल्या हे त्यांनी नाटकातून सादर केले. सांची जीवने हिने आपल्या नाट्यातून शिक्षणाचे महत्व सांगितले. विद्यांर्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होवून देशसेवा आणि समाजसेवेचे व्रत घ्या असा संदेश दिला आहे. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे एकूण ३०० विद्यार्थी उपस्थित राहिलेत. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. अमृता डोरलीकर हिने केले व आभार कु. पियू राजमलानी हिने मानले.

# ७) "शंभर युवा-महाराष्ट्र नवा"

दि. २५/०१/२०१९

डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या अंतर्गत सुवर्ण महोत्सव सांस्कृतिक समितीच्या वतीने विद्यार्थ्यांना आपल्या अधिकारासोबतच कर्तव्याची जाणीव निर्माण व्हावी तसेच देशाच्या प्रगतीत तरुणाची काय भूमिका राहायला पाहिजे. तसेच विद्यार्थ्यांत आदर्श नागरिकांचे गुण निर्माण व्हावे या उद्देशाने 'शंभर युवा-महाराष्ट्र नवा' या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २५/०१/२०१९ रोजी करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते कविवर्य प्रा. ज्ञानेश वाकुडकर हे होते. त्यांनी आपल्या भाषणातून विविध शब्दाचे अर्थ मनोरंजनातून सांगण्याचा प्रयत्न केला. आजचे नेते जनतेची कशा पद्धतीने दिशाभूल करीत आहे हे त्यांनी कवितेच्या रुपात सादर केले. प्राणायमाचे महत्व व्यंगात्मक पद्धतीने सांगितले. देशाच्या विकासात तरुणाची भूमिका अतिशय महत्वाची असून आजचा तरुण संपूर्ण देशाचे चित्र बदलून टाकण्याची ताकत त्यांच्यात आहे. लोकशाही यशस्वी करण्याकरिता तरुणांनी जनकल्याणकारी बाबीचा स्विकार करावा व राजकारणात सहभागी होवून भ्रष्टाचारी नेत्यांची हकालपट्टी करावी. देशाच्या विकासात तरुणांनी हातभार लावावा. देशाची प्रगती दिवसेंदिवस व्हावी म्हणून तरुणांनी सतत प्रयत्न करावा. सरांनी मनोरंजनात्मक कविता सादर केल्या. या कार्यक्रमात एकूण 300 विद्यार्थी सहभागी झाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. किशोर वरभे यांनी केले व आभार कुणाल गुप्ता यांनी मानले.

## ८) "वादळ भिमाचा"

दि. २९/०१/२०१९

डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला व वाणिज्य महाविद्यालय अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी, विद्यार्थ्यांतील सुत्त गुणांचा विकास व्हावा म्हणून भिम-बुद्ध गीतांचा कार्यक्रम 'वादळ भिमाचा' चे आयोजन दिनांक २९/०१/२०१९ रोजी करण्यात आले. माजी विद्यार्थी प्रविण भिवगडे आणि संच, 'ग्रिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' करणारे गायक यांनी आंबेडकरांच्या स्मृतींना उजाळा देण्याकरिता विविध गीते सादर केली.

विद्यार्थ्यांना आपल्यातील सुत्त गुणांचा विकास व्हावा म्हणून संधी देण्यात आली. काही विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केलीत. एम. ए. व बी. ए. च्या परिक्षेत प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे सन्मान चिन्ह देवून स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमात एकूण ४०० विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. प्रा. नरेंद्र बागडे यांनी केले व आभार डॉ. सुशांत चिमनकर यांनी मानले.